**सदरील मार्गदर्शक सुचना आपले स्तरावरुन क्षेत्रिय कार्यालयास त्वरीत वितरीत करणेत याव्यात.**

**''उन्नत शेती - समृध्द शेतकरी ''**
**पंधरवडा मार्गदर्शक सुचना**
**दि.२४ मे ते ७ जून २०१८**

जा.क्र./कृमावि(विप्र-४)/उ.शे./२३६/२०१८
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे
दि. ११/०५/२०१८

**प्रति,**

**१. विभागीय कृषि सहसंचालक, (सर्व) --------विभाग------**
**२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (सर्व) जि. ----------------**
**३. प्रकल्प संचालक (आत्मा), (सर्व) जि. ----------------**
**४. कृषि विकास अधिकारी, (सर्व) जि.प. ----------------**

**विषय – 'सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे'**
**दि.२४ मे ते ७ जून २०१८ या कालावधीत''उन्नत शेती - समृध्द शेतकरी '' पंधरवडा साजरा करणेबाबत मार्गदर्शक सुचना.....**

**संदर्भ** - शासन नि.क्र.०४१८/प्रक्र१५५/१४-अे, कृषि व पदुम विभाग दि.२७/०४/२०१८, मंत्रालय, मुंबई -३२

सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे या उद्दिष्ट पुर्तीच्या अनुषंगाने दि.२४ मे ते ७ जून, २०१८ हा रोहिणी नक्षत्राचा कालावधी ''उन्नत शेती - समृध्द शेतकरी'' पंधरवडा म्हणून राबविण्यासाठीचे शासन निर्देश प्राप्त झाले आहेत. कृषि विभागामार्फत शेती विकासाच्या तसेच शेतकरी कल्याणाच्या विविध योजना व कार्यक्रम राज्यात राबविले जातात. मागील वर्षापासून खरीप व रब्बी हंगामात ''उन्नत शेती - समृध्द शेतकरी '' मोहिम राबविण्यात येत आहे.

कृषि विभागाच्या प्रचलित योजनांच्या अमंलबजावणीत अधिक सुटसुटीतपणा तसेच सुसूत्रता आणुन योजना पारदर्शकरीत्या अधिक प्रभाविपणे राबविण्याचा शासनाचा उद्देश आहे. याचाच एक भाग म्हणून राज्यात रोहिणी नक्षत्रातील पंधरा दिवस ''उन्नत शेती - समृध्द शेतकरी '' हा तंत्रज्ञान प्रचार व प्रसार पंधरवडा साजरा करुन आधुनिक कृषि तंत्रज्ञान राज्यातील सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे अभिप्रेत आहे. यासाठीच्या सविस्तर मार्गदर्शक सुचना पुढीलप्रमाणे -

**उद्देश :-**

- प्रमुख पिकांकरीता आधुनिक आणि अद्ययावत कृषि तंत्रज्ञानाचा शेतक-यांपर्यंत प्रसार करणे.
- शासनाच्या शेतक-यांसाठी असलेल्या विविध योजना/अभियान/उपक्रम इ.ची माहिती आणि लाभ घेण्याच्या कार्यपद्धतीबाबत जनजागृती करणे.
- जमिनीची सुपिकता वाढविण्याच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजनांबाबत शेतक-यांमध्ये जागरुकता निर्माण करणे.
- बीजप्रक्रियेबाबत प्रात्यक्षिकांचे आयोजनाद्वारे शेतक-यांमध्ये जागरुकता निर्माण करणे.
- पीक विमा योजनेंतर्गत जास्तीत जास्त शेतकऱ्यांना सहभागी करुन घेऊन नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांच्या होणाऱ्या नुकसानी पासून शेतकऱ्यांना पिकांना विमा संरक्षणाबाबत जागरुकता निर्माण करणे.
- प्रचलित योजनेचा लाभ न मिळणाऱ्या तसेच कृषि तंत्रज्ञान प्रात्यक्षिकामध्ये सहभागी नसणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रमुख पीकांची उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीनेतंत्रज्ञान प्रसार करणे.
- याकरीता विविध प्रसार माध्यमे, वर्तमानपत्रे, दुरदर्शन, आकाशवाणी, दृकश्राव्ये माध्यमे, समाज माध्यमे, कृषि महोत्सव इ. द्वारे राज्यातील शेतकऱ्यापर्यंत कृषि तंत्रज्ञानाचा प्रसार करणे.

- कृषि सहायकांनी त्यांचे अधिनस्त गावांमध्ये तयार केलेल्या कृषि वार्ताफलकांद्वारे कृषि तंत्रज्ञानाचा प्रसार होण्याच्या दृष्टीने शेतक-यांमध्ये जागरुकता निर्माण करणे.
- विस्तार कार्यक्रमात कृषि विद्यापीठ व कृषि संलग्न विभाग/संस्थामधील शास्त्रज्ञांनी सक्रीय सहभाग घेउन कृषि व संलग्न विभागाचे तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन करणे.
- ‘पीक उत्पादनात स्थैर्य राखत उत्पादन खर्च कमी करणे’ आणि ‘प्रति थेंब अधिक पीक’ या संकल्पनांबाबत जनजागृती व मार्गदर्शन करणे.
- कापसावरील शेंदरी बोंड अळी, भातावरील तपकिरी तुडतुडे आणि सोयाबीनवरील मोझॅक व पिवळा मोझॅक यांच्या एकात्मिक कीड/रोग व्यवस्थापनाबाबत जनजागृती व मार्गदर्शन करणे.
- कापसावरील शेंदरी बोंड अळीच्या नियंत्रणासाठी फेरोमन ट्रॅप (कामगंध सापळे) आणि ट्रायकोकार्डसच्या महत्व व वापराबाबत जागरुकता निर्माण करणे.
- एकात्मिक शेती पद्धती, बहुवार पीक पध्दती तसेच आंतरपीक पध्दतींबाबत जनजागृती करणे.
- कृषि संलग्न व कृषि पुरक व्यवसाय जसे पशुपालन, मधुमक्षिका पालन, मत्स्यशेती, रेशीम उद्योग इत्यादींच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे निव्वळ आर्थिक उत्पन्न वाढविणेकरीता मार्गदर्शन करणे.
- प्रगतीशील शेतकऱ्यांनी उच्चतम उत्पादन वाढीकरीता अवलंबलेले नाविन्यपूर्ण कृषि तंत्रज्ञान इतर शेतकऱ्यांपर्यंत पोहचवणे.
- मोबाईल धारक शेतक-यांना मोफत एस.एम.एस. सेवेचा लाभ व्हावा म्हणून एम-किसान पोर्टलवर शेतक-यांची नोंदणी करणे.
- गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेमध्ये सहभाग वाढविण्यासाठी व्यापक प्रमाणात जनजागृती करणे.
- विविध प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीपासून बचावात्मक उपाययोजनांबाबत शेतक-यांमध्ये जनजागृती करणे.
- गट/समुहाच्या माध्यमातून शेतीमालावर प्राथमिक प्रक्रिया, मुल्यवर्धन व विपणन करणेबाबत जागरुकता निर्माण करणे.
- किडनाशके हाताळाणी आणि फवारणी करताना घ्यावयाच्या काळजीबाबत शेतक-यांमध्ये जनजागृती करणे.
- विविध कृषि निविष्ठा खरेदी करताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत शेतक-यांमध्ये जनजागृती करणे.
- जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून तयार झालेल्या जलसाठ्यांमधील पाण्याच्या संरक्षित सिंचनासाठी वापराबाबत जनजागृती करणे.

**कार्यपद्धती** :-

या मोहिमेंतर्गत ‘तालुका’ हा कृषि विकास व उत्पादन वाढीसाठी नियोजनाचा घटक म्हणून निश्चित करण्यात आला आहे. तालुकानिहाय तयार करण्यात आलेल्या आराखडयानुसार प्रमुख पिकांची सध्याची उत्पादकता अनुवंशीक उत्पादन क्षमता आणि साध्य करावयाचा उत्पादन वाढीचा लक्षांक याबाबत प्रत्येक गावात सभा घेऊन शेतकऱ्यांना अवगत करावे. हा लक्षांक साध्य करण्याकरीता संलग्न कृषि विद्यापीठातील, कृषि विज्ञान केंद्रे आणि संबंधित संशोधन संस्था/केंद्रे यांचेकडील तज्ञांच्या सल्ल्याने निश्चित केलेल्या कृषि तंत्रज्ञानाच्या माहितीबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे. उत्पादन वाढीकरीता अत्यावश्यक तंत्रज्ञानाच्या बाबींवर प्राधान्याने भर द्यावा.

**राज्यातील प्रत्येक गावामध्ये पंधरवड्याच्या यशस्वीततेसाठी सर्वसाधारणपणे पुढिलप्रमाणे कार्यपद्धतीचा अवलंब करावा.**

- कृषि संलग्न विभाग, जिल्हा परिषद, राष्ट्रीयकृत आणि सहकारी बँका, कृषि संशोधन केंद्र, कृषि महाविद्यालये, कृषि विज्ञान केंद्रे, कृषि तंत्रनिकेतन, अशासकीय संस्था, कृषि उत्पन्न बाजार समित्या, महाबीज, महाराष्ट्र कृषि पणन मंडळ, वखार महामंडळ तसेच महसूल, वन विभाग, सहकार, आदिवासी विकास विभाग इत्यादींच्या जिल्हास्तरावर/गावपातळीवरील कार्यक्रमामध्ये सक्रीय सहभागाकरीता आणि समन्वयाकरीता जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली आत्मा नियामक मंडळाची विशेष बैठक आयोजित करुन पंधरवड्याची रुपरेषा व नियोजन करावे.
- गावस्तरावरील कार्यक्रम प्रभावी होण्यासाठी तालुक्यातील प्रगतशील शेतकरी/ कृषि पुरस्कार प्राप्त/पीकस्पर्धा विजेते शेतकरी यांमधून काही शेतक-यांची निवड करुन त्यांना प्रेरित करणेसाठी तालुकास्तरावर एकदिवशीय कार्यशाळेचे उपविभागीय कृषि अधिका-यांनी आयोजन करावे. या कार्यशाळेद्वारे प्रेरित शेतक-यांच्या मार्गदर्शनाचा लाभ गावपातळीवरील कार्यक्रमांमधून इतर शेतकऱ्यांना मिळवून द्यावा.
- गावामधील कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता गावातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, कृषि विज्ञान मंडळ, सर्व शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, कृषि विज्ञान केंद्रे, गावाशी संबंधित राष्ट्रीयकृत आणि सहकारी बँक शाखा, आत्मा समितीतील सदस्य, इतर कृषि संलग्न विभागाचे ग्रामस्तरीय कर्मचारी/अधिकारी यांचेशी योग्य समन्वय राखून त्यांचाही सहभाग घ्यावा.
- प्रत्येक गावातील कार्यक्रमाकरीता कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक यांच्या व्यतिरिक्त किमान मंडळ कृषि अधिकारी अथवा त्याचे वरील दर्जाचा एक अधिकारी उपस्थित राहील, अशा पद्धतीचा आराखडा उपविभागीय कृषि अधिका-यांनी तयार करुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करावा.
- जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी आणि प्रकल्प संचालक आत्मा यांनी संबंधित कृषि विद्यापीठांशी संपर्क साधून पीक उत्पादन तंत्रज्ञानाच्या घडिपत्रिका, पुस्तिका, भित्तीपत्रके इ. छपाई करुन शेतक-यांच्या सभा/प्रशिक्षणादरम्यान वाटपाबाबत कार्यवाही करावी. प्रत्येक गावांमध्ये पंधरवडा साजरा करताना कार्यक्रमापुर्वी अथवा कार्यक्रमाच्या वेळी प्रमुख ठिकाणी भित्तीपत्रके लावली जातील याबाबत काळजी घ्यावी.
- पंधरवडयापूर्वी आकाशवाणी, दुरदर्शन, कम्युनिटी रेडिओ, स्थानिक केबल नेटवर्क, समाज माध्यमांद्वारे तसेच संबंधित जिल्हा माहिती अधिकारी यांचे माध्यमातून स्थानिक वर्तमानपत्रांतून सदर कार्यक्रमास विस्तृत प्रसिद्धी द्यावी.
- जिल्हयातील शेतकऱ्यांकरीता आवश्यक कृषि तंत्रज्ञानाबाबत, वर्तमानपत्रे, वर्तमानपत्रामधील लेख, आकाशवाणीवरील विविध कार्यक्रम याद्वारे माहिती प्रसिध्द करावी.
- पंधरवडा कालावधीत आयोजित होणाऱ्या आणि पार पडलेल्या कार्यक्रमांना स्थानिक वर्तमानपत्रे, आकाशवाणी, दुरदर्शन, समाजमाध्यमे इ.मधुन विस्तृत प्रमाणात प्रसिध्दी द्यावी.
- माहे मे मध्ये होणाऱ्या मासिक जिल्हा चर्चासत्रामध्ये सदर पंधरवडा आयोजनाबाबत विस्तृत चर्चा करुन कृषि संदेशाबाबत कार्यवाही करावी. सदर संदेश लिखित स्वरुपात कृषि सहायकांपर्यंत पोहोच करावा. तसेच सदर संदेशास प्रमुख वर्तमानपत्र, आकाशवाणी इ.प्रसार माध्यमातून प्रसिध्दी द्यावी आणि कृषि सहायकांनी सदर संदेश त्यांच्या अधिनस्त गावातील कृषि वार्ताफलकावर प्रसिध्द करावा.
- गावभेटीदरम्यान शेतकऱ्यांना सुक्ष्मसिंचन योजनेचा लाभ घेण्याकरीता ऑनलाईन अर्जप्रणालीबाबत प्रात्यक्षिकाद्वारे आवश्यक मार्गदर्शन करावे. तसेच सुधारीत प्रस्ताव मंजुरीच्या टप्यांबाबत अवगत करावे.

* पंधरवडा कालावधीत केंद्र व राज्य शासनाच्या अधिकृत सक्षम संस्थानी ज्या यंत्र अवजारांचे रितसर परिक्षण करुन ते BIS अथवा अन्य सक्षम संस्थानी निश्चित केलेल्या प्रमाणकानूसार असल्याचे प्रमाणित केलेल्या यंत्र/अवजारांबाबत संबंधिताशी समन्वय साधून प्रात्यक्षिकाचे (Demo) आयोजन करावे.

**सनियंत्रण व पर्यवेक्षण –**

सदर पंधरवडा आयोजन करण्याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा) आणि कृषि विकास अधिकारी, जि.प. यांची संयुक्तपणे राहील. संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी याबाबत सनियंत्रण करतील. जिल्हास्तरावर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक तर विभागस्तरावर विभागीय अधिक्षक कृषि अधिकारी हे नोडल अधिकारी म्हणुन काम पाहतील.

पंधरवड्याच्या यशस्वीततेसाठी कृषि आयुक्तालय स्तरावरुन जिल्हा व विभागस्तरावरुन सनियंत्रण व पर्यवेक्षण करण्यासाठी सोबतच्या **परिशिष्टामध्ये** दर्शविलेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करणेत येत आहे. पंधरवडा कालावधीत कृषि आयुक्तालयस्तरावरुन नियुक्त केलेल्या विभाग व जिल्हास्तरीय समन्वय अधिका-यांना कोणत्याही प्रकारची रजा मंजुर केली जाणार नाही. सदर अधिकाऱ्यांनी कार्यक्रमापुर्वी पंधरवड्याचे नियोजन झाले असलेबाबतची खात्री करुन पंधरवड्यामध्ये विभागातील, जिल्हयातील कार्यक्रमांना भेटी देऊन कार्यक्रम यशस्वीततेसाठी प्रयत्न करावेत आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांना सादर करावा. कृषि आयुक्तालयस्तरावरुन कृषि उपसंचालक ,माहिती यांची सदर पंधरवड्याकरीता नोडल अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात येत आहे.

**सदर पंधरवड्यासाठी स्वतंत्र निधीची तरतूद नाही. पंधरवडा साजरा करण्याच्या दृष्टीने घ्यावयाचे कार्यक्रम, भित्तीपत्रिका, घडिपत्रिका प्रकाशने इ. बाबींसाठी आत्माअंतर्गत कॅफेटेरियामधील उपलब्ध निधी, विविध योजना/अभियानांतर्गत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी आणि कृषि विकास अधिकारी, (जि.प.) यांचेकडे उपलब्ध असलेल्या संकिर्ण/आकस्मिक निधी, प्रचार व प्रसिध्दीकरीता असणारी तरतूद यामधुन विहीत लेखा पद्धतीचा अवलंब करुन खर्च करण्यात यावा.**

वरीलप्रमाणे गावनिहाय नियोजनानुसार पंधरवडा कालावधी पार पडताच जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्हयाचा एकत्रित अहवाल सोबतच्या प्रपत्रात दि.११ जुन २०१८ पर्यंत आयुक्तालयास सादर करावा. आयोजित कार्यक्रमांचे निवडक फोटो ddinfor@gmail.comया ई-मेलवर पाठवावेत.

**सोबत** – प्रपत्र, परिशिष्ट व संदर्भिय शासननिर्णय

सदर मार्गदर्शक सूचना कृषि विभागाच्या संकेतस्थळावरदेखील उपलब्ध आहेत.

31.05.18

**आयुक्त, कृषि**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत-** १.मा. अपर मुख्य सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२.मा. सचिव (पदुम), मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहिती व कार्यवाहीसाठी सविनय सादर.

**प्रत - माहिती तथा योग्य कार्यवाहीस्तव.**

१. मा.कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
२. मा.कुलगुरु,डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला
३. मा.कुलगुरु, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली
४. मा.कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी

५. मा.कुलगुरु, महाराष्ट्र पशु आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
६. आयुक्त (पशुसंवर्धन ),पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे
७. आयुक्त ( दुग्धव्यवसाय), दुग्धव्यवसाय आयुक्तालय,मुंबई
८. आयुक्त (मत्स्यव्यवसाय),मत्स्यव्यवसाय आयुक्तालय, मुंबई
९. जिल्हाधिकारी (सर्व)
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. (सर्व)
११. कार्यकारी संचालक (पणन), पणन महामंडळ, पुणे
१२. संचालक,(रेशीम) संचालनालय,नागपुर
१३. संचालक,(मधुमक्षिकापालन),वनाधारीत उद्योग, मुंबई.
१४. कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, (सर्व)
१५. विभाग/जिल्हा समन्वयक अधिकारी, (सर्व)-----------------------------------

**प्रपत्र - अ**

**''उन्नत शेती - समृध्द शेतकरी'' पंधरवडा**

**तालुकास्तरीय एकदिवशीय कार्यशाळा आयोजन**

**जिल्हा :..................विभाग : ................**

| अ क्र | तालुक्याचे नाव | कार्यशाळेचा दि. | कार्यशाळेचे स्थळ | उपस्थित शेतकरी संख्या (प्रगतशील शेतकरी/ कृषि पुरस्कार प्राप्त/पीकस्पर्धा विजेते शेतकरी) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

स्वाक्षरी/-

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, जि.---------

---

**प्रपत्र -ब**

**''उन्नत शेती - समृध्द शेतकरी'' पंधरवडा अहवाल**

**जिल्हा :..................विभाग : ................**

| अ क्र | जिल्ह्यातील एकुण गावे संख्या | कार्यक्रम घेतलेली गावे संख्या | उपस्थित शेतकरी संख्या | उपस्थित मार्गदर्शक संख्या | | | आयोजित कार्यक्रमाचा संक्षिप्त तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शास्त्रज्ञ | अधिकारी | प्रगतीशील शेतकरी | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

स्वाक्षरी/-

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, जि.---------

# परिशिष्ट

## "उन्नत शेती - समृध्द शेतकरी" पंधरवडा -२०१८ राज्यस्तरीय समन्वय अधिकाऱ्यांचा तपशिल

| अक्र | विभाग | जिल्हा | जिल्हास्तरीय समन्वयक | | विभागस्तरीय समन्वयक |
|---|---|---|---|---|---|
| | | | नाव | पदनाम | नाव व पदनाम |
| १ | ठाणे | ठाणे | श्री.किशोर डेरे | कृउसं (प्रयोगशाळा) गुनि-१ | श्री.अनिल बनसोडे<br>कृषि सहसंचालक(विप्र.२)<br>मो.९४०३७२९७७०<br>jdaextn2@rediffmail.com |
| २ | | रायगड | श्री.डी.बी.पाटील | कृ.उ.सं.(सांख्यिकी) | |
| ३ | | रत्नागिरी | श्री.गणेश मांढरे | कृ.उ.सं.(फो.शे.अ.) | |
| ४ | | सिंधुदुर्ग | श्री.फ्लोरीन डीसोझा | कृ.उ.सं.(कर्म.कल्याण) | |
| ५ | | पालघर | श्री. एस.बी.भालेराव | कृउसं.फलो-२ (रोपवाटीका) | |
| ६ | नाशिक | नाशिक | श्री. के.टी.शिंदे | कृ.उ.सं.(सं.प्र.) | श्री. एस. बी. खेमनर<br>संचालक, आत्मा<br>मो.९८२२००६२३१<br>diratmams@gmail.com |
| ७ | | जळगाव | श्री.प्रकाश सोनवणे | कृ.उ.सं.( मृद-७) | |
| ८ | | धुळे | श्री हिरेमठ | कृउसं (बियाणे) गुनि १/१ | |
| ९ | | नंदूरबार | श्री.व्ही.जी.कावडे | प्रमुख सनि.व मूल्य. | |
| १० | पुणे | पुणे | श्री.गंगाधर मुळमाडे | कृउसं, कृषि प्रक्रिया | श्री.विजय घावटे<br>कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)<br>९४२२२८७९८०/ ९४०४९८३४३२<br>agridext.mah@gmail.com |
| ११ | | अहमदनगर | श्री.के.एस.मुळे | अ.कृ.अ.दक्षता पथक | |
| १२ | | सोलापूर | श्री.एस.एम.घाडगे | कृ.उ.सं.( विप्र-७) | |
| १३ | कोल्हापूर | कोल्हापूर | डॉ.राम लोकरे | कृ.उ.सं.(विप्र-२) | श्री.एम.एस.घोलप<br>संचालक (नि.व.गुनि)<br>मो. ९४२२०१४९३५<br>directorqc@rediffmail.com |
| १४ | | सातारा | श्री. रविंद्र भोसले | प्रकल्प व्यवस्थापक<br>(नि.शे.)एन.एच.एम | |
| १५ | | सांगली | श्री.शशिकांत जाधव | कृ.उ.सं.(गुनि-५) | |
| १६ | औ.बाद | औरंगाबाद | श्री.शिवराज घोरपडे | मो.गा.त.,वसुंधरा पाणलोट | श्री.पी.एन.पोकळे<br>संचालक (फलोत्पादन)<br>मो. ९४२३३३९५५९<br>agridhrt@gmail.com |
| १७ | | बीड | श्री.हिरालाल म्हस्के | कृ.उ.सं.(मृद्-२) | |
| १८ | | जालना | श्री.डी.एस. शिंदेकर | कृ.उ.सं.( फलो.-४ सूक्ष्मसिंचन) | |
| १९ | लातूर | लातूर | श्री.अनिल साळुंखे | कृउसं (सांख्यिकी २) | श्री. शिरीष जमदाडे<br>कृषि सहसंचालक (फलो.)<br>मो.९४२२४६३२०६<br>jdahortms@rediffmail.com |
| २० | | उस्मानाबाद | डॉ.जे.आर.टेकाळे | कृ.उ.सं. (कृषि गणना ) | |
| २१ | | परभणी | श्री.एम.एस.घंवडे | कृउसं, फलो-३ (कायदो.सं.) | |
| २२ | | हिंगोली | श्री.महेश झेंडे | कृउसं (मृद-१)<br>रापाविका/पीएमकेएसवाय | |
| २३ | | नांदेड | श्री.चंद्रकांत गोरड | मुख्य निरीक्षक (गुनि ५/८) | |
| २४ | अमरावती | अमरावती | श्री.अशोक बाणखेले | कृउसं मृसंमुचा | डॉ.के.पी. मोते<br>संचालक (मृदसंधारण)<br>मो.९४२३९६३०७९<br>agridsc2006@rediffmail.com |
| २५ | | बुलढाणा | श्री. उदय देशमुख | मुख्य सांख्यिक | |
| २६ | | अकोला | श्री.सुभाष काटकर | मु.गु.नि.अ. | |
| २७ | | यवतमाळ | श्री.रमेश घुमाळ | कृ.उ.सं.( मृद-४) | |
| २८ | | वाशिम | श्री.महादेव निकाळकर | कृउसं, मृद-५,आदर्शगाव | |
| २९ | नागपूर | नागपूर | श्री एस. आर. चलवदे | प्रकल्प व्यवस्थापक (सा.शे.) | श्री.ज्ञानेश्वर बोटे<br>कृषि सहसंचालक (मृदसंधारण) प्र.<br>मो९४२२२८४३८४<br>jdasoil@rediffmail.com |
| ३० | | वर्धा | श्री.रविंद्र घनाळ | कृ.उ.सं.( विप्र-३) | |
| ३१ | | भंडारा | श्री. शिवराज ताटे | कृ.उ.सं.( द.प.) | |
| ३२ | | गोंदिया | श्री.विनायक देशमुख | कृउसं, (विप्र-६) (शेतकरी मासिक) | |
| ३३ | | चंद्रपूर | श्री.बाळासाहेब नगर | कृउसं (मृद-३) (मपावि) | |
| ३४ | | गडचिरोली | श्री. हरी बापतीवाले | कृ.उ.सं.( विप्र-१) | |

आयुक्त, कृषि
महाराष्ट्र राज्य, पुणे